# प्रेसनोट दिनांक २७/०३/२०२३

## घरफोडी करुन दागीने चोरी करणा-या सराईत महीलेस अवघ्या २४ तासांत पिंपरी पोलीसांनी केले अटक

दि.२५/०३/२०२३ रोजी पोलीस उप-निरीक्षक अनिरूध्द सावर्डे पो.हवा. ११८२ बारशिंगे, पो.ना.१७६२ करपे, पो.ना. १२२२ बागसिराज, पो.हवा. १५९१ भारती, पो.ना.१७६१ महाडीक, पो.शि. २९४६ शेख, पो.शि.२६५७ रेड्डी असे पिंपरी पो.स्टे येथे हजर असताना, पो.हवा. ११८२ बारशिंगे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, १५ दिवसांपुर्वी संत तुकारामनगर येथे घरफोडी चोरी करणारी सराईत महीला गुन्हेगार ही पवनेश्वर मंदीर परीसरात फिरत आहे. अशी बातमी मिळाल्याने सदर माहीती श्री. शंकर आवताडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पिंपरी पोलीस स्टेशन यांना कळविली असता, त्यांनी सदर महीलेस ताब्यात घेवुन चौकशी करण्याचे मुफजल आदेश दिल्याने लागलीच वरील स्टाफ सह रवाना होवुन पवनेश्वर मंदीराजवळ जावुन सदर ठिकाणी शोध घेतला असता, बातमिदाराने दिलेल्या माहीतीप्रमाणे एक महीला दिसल्याने तीस पकडुन ताब्यात घेवुन नाव व पत्ता विचारता तीने आपले नाव . मीरा अशोक साठे, वय ३० वर्षे, रा. रूम नं. ४, दुसरा मजला, तिलक हाईटस्, दापोडी, पुणे असे असल्याचे सांगुन तीला अधिक चौकशीकरीता पिंपरी पोलीस स्टेशन येथे आणले असता तीचे ताब्यात काही दागीने मिळाले तेव्हा तीची अधिक कसुन चौकशी करता तीने १५ दिवसांपुर्वी संत तुकारामनगर पिंपरी, मागील वर्षी बौध्दनगर, पिंपरी येथे घर फोडुन तसेच दोन दिवसांपुर्वी देहु गाव येथे उघड्या घरात घुसुन सोन्याचे व चांदीचे दागीने चोरी केल्याचे कबुल केले असता तीस **पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नं.२७०/२०२३, भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० या गुन्ह्यात अटक करण्यात आले आहे. पोलीस कोठडीदरम्यानचे तपासामध्ये सदर महीला आरोपी कडुन देहुरोड पोस्टे गुरनं १९९/२०२३, भादंवि कलम ३८० व पिंपरी पोलीस स्टेशन ०२/२०२२, भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० असे तीन गुन्हे उघड करण्यात आले असुन तीचेकडुन सोन्याचे गंठण, सोन्याचे मंगळसुत्र, मोहनमाळ, झुमके, अंगठी, टॉप्स तसेच चांदीची देवीची मुर्ती, नाणी, पैंजण असा एकुण ११,५७,३८०/-रूपयांचे सोन्याचे व चांदीचे दागीने व ४० हजार रूपयांची दुचाकी मोपेड असा एकुण ११,९७,३८०/-रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.** तसेच सदर आरोपीकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्याचा तपास पोलीस उप-निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे पिंपरी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. मनोजकुमार लोहिया पोलीस सह आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. संजय शिंदे अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.श्री. विवेक पाटील पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा.श्रीमती प्रेरणा कट्टे सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, श्री. शंकर आवताडे सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक पिंपरी पोलीस ठाणे, श्रीमती रूपाली बोबडे पोलीस निरीक्षक गुन्हे पिंपरी पोलीस ठाणे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिरूध्द सावर्डे, पो.हवा. बारशिंगे, पो.हवा. हांडे, पो.ना. करपे, पो.ना. बागसिराज, पो.ना. भारती, पो.ना. महाडीक, पो.शि. शेख, पो.शि. जानराव, पो.शि. रेड्डी यांनी केली आहे.